# UNIVERSITY OF PUNE

## NATIONAL SERVICE SCHEME

Ganeshkhind, Pune - 411 007

**Dr. Shakera Inamdar**
M.Sc., Ph.D.
**Programme Co-ordinator**

**Office No. : 020-25697341**
**25601153, 25601160**
**Fax No. : 020-25697341**
**Mobile No.: 9822707061**


संदर्भ : रासेयो/233/१२

दि. १६ ऑगस्ट २०१२

**प्रति**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा**
**पुणे विद्यापीठ, पुणे**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन शिबिराच्या निवडीसाठी स्वयंसेवक पाठविण्याबाबत...**

**महोदय,**

दरवर्षी राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर मुंबई येथे घेण्यात येते तसेच दिल्ली येथे राष्ट्रस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराचे आयोजन करण्यात येते. पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवडचाचणी शिबीर व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवडचाचणी शिबीराचे पुणे, अहमदनगर, नाशिक याप्रमाणे जिल्हानिहाय पद्धतीने आयोजन करण्यात आले असून या शिबिराच्या निवडीसाठी आपण आपल्या महाविद्यालयातील एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनीस खालीलप्रमाणे निवड चाचणीसाठी शिबिर स्थळी सकाळी १०.०० वाजता पाठवावे ही विनंती.

| अ.न. | शहर | निवड चाचणी शिबिराचे ठिकाण | शिबिराची दिनांक | संपर्कासाठी महा.फोन नं. |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक जिल्हा | के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, विद्यानगरी, पंचवटी, जि. नाशिक – ४२२ ००३ | दि.२१/०८/२०१२ | कार्यालय फोन नं. ०२५३–२५१२८७६ फॅक्स ०२५३–२५११९६२ |
| | | | प्रा. एन.बी.गुरूले मो. ९९२२६२६७३४ | प्रा. व्ही.के. पाटील मो. ९४२२७४७३३५ |
| २. | अहमदनगर जिल्हा | संगमनेर नगरपालिका कला, मालपाणी वाणिज्य व सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. नाशिक महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर ४१२६०५ | दि.२२/०८/२०१२ | कार्यालय फोन नं. ०२४२५–२२५८९३ |
| | | | प्रा. फलफले पी.जे मो. ९४२२३२६३४९ | प्रा. नवले एस.बी. मो.९२०९२९३८२८ |
| ३. | पुणे शहर/पुणे ग्रामीण | मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे | दि.२४/०८/२०१२ | कार्यालय फोन.नं. ०२०–२५५३५९२७ प्रा.पी.एस.वऱ्हाडे मो.९८२२८५६५२७ |

P.T.O.

* **SRD/NRD विद्यार्थ्यांची निवड करतांना खालील गोष्टींचा विचार करावा.**

१. स्वयंसेवकाने राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये एक वर्ष व एक शिबिर पूर्ण केलेले असावे.
२. स्वयंसेवक अविवाहित असावा.
३. मुली उंची १५५ ते १६५ से.मी.,
मुले उंची १६५ ते १७५ से.मी. च्या दरम्यान.

४. विद्यार्थी सुदृढ व सक्षम असावा., उंचीच्या मानाने कमी वजन असणारा नसावा.
५. छाती : मुले –८०से.मी., मुली – ७५ से.मी.
(फुगलेली व न फुगलेली छाती यातील अंतर किमान ५ से.मी.)

६. फिजीकल फिटनेस :
१. रनअप : २ किमी अंतर – १५ मिनीटे
२. पुशअप्स व सिटअप्स
एक दमात मुले –२०, मुली – १५
३. चिन अप्स मुले –०८, मुली – ०५

७. S.R.D. साठी निवड झाल्यास स्वयंसेवकास प्रथमत: पुणे विद्यापीठ, पुणे येथील शिबिरात व नंतर मुंबई येथील शिबिरात सहभागी व्हावे लागेल.

८. N.R.D. साठी निवड झाल्यास स्वंयसेवकास प्रथमत: उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथील शिबिरात, नंतर पश्चिम विभागीय शिबिर व त्यानंतर दिल्ली येथील शिबिरात सहभागी व्हावे लागेल.

९. स्वयंसेवकास रा.से.यो ध्येय, उद्दीष्टये व विविध उपक्रमांची संपूर्ण माहिती असावी.

१०. वक्तृत्व/कला/सांस्कृतिक कार्यक्रम/वाद्य/नाटय यापैकी निपुण असलेल्या स्वयंसेवकास प्राधान्य दिले जावे.

११. स्वयंसेवकाची निवड चाचणीच्या दिवशी भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात येईल. (निवास व्यवस्था करण्यात येणार नाही)

१२. स्वयंसेवकांचा शिबिर स्थळापर्यंत जाण्या–येण्याचा खर्च महाविद्यालयाने रा.से.यो. नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

१३. तिन्ही जिल्हयामधून एकूण ७० स्वयंसेवकांचीच निवड करावयाची असल्याने निवड चाचणीस उपस्थित राहिला म्हणजे आपली निवड झालीच असे स्वयंसेवकाने समजू नये.

स्वयंसेवकाने निवड चाचणीस येतांना सोबत जाडलेल्या कागदपत्रांची पूर्तता करून आणणे आवश्यक आहे. (यासंदर्भात अधिक माहिती हवी असल्यास रासेयो जिल्हा समन्वयक यांचेशी संपर्क साधावा.)

**कळावे, धन्यवाद!**

सोबत : निवड चाचणी संदर्भातील कागदपत्रे.

आपली विश्वासू

**कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**